


## माणसं काही अशी, काही तशी...

कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात अनेक माणसांचा संपर्क येतो.बाल वयापासून ते वृध्द अवस्थे पर्यंत वेगवेगळ्या लोकांच्या गाठीभेटी होतात. या सगळ्यांचे स्वभाव मात्र निरनिराळे असतात. जन्माची व रक्ताची नाती असणारे नातेवाईक, चांगले व वाईट मित्र आणि इतर खूप लोक आपल्या संबधांतले असतात. त्यांच्यासोबत आपण सुख आणि दुःख शेअर करत असतो. मनातले भाव शब्द रूपात व्यक्त करतो. यापैकी काही माणसं अशी असतात आणि काही माणसं तशी असतात.

काही माणसं अशी असतात म्हणजे त्यांच्या वागण्या बोलण्याचा थांगपत्ता कधीच लागत नाही. ही माणसं कमालीची स्वार्थी, लबाड, धूर्त, कपटी, चालाख, चरीत्रहीन आणि वेगवेगळ्या खेळी खेळणारे असतात.अशा माणसांना फक्त पैसा, संपत्ती, सोने, नाणे हवे असतात. ही माणसे कारणाशिवाय कोणाला भेटत नाहीत, कोणाशी मैत्री करत नाहीत आणि कोणाला जास्त जवळ येऊ देत नाहीत. ज्या माणसांमुळे स्वार्थ साधला जातो त्या माणसांचे हे लोक तोंड भरून स्तुती करतात. आणि ज्या माणसां कडून एका कवडीचा सुध्दा फायदा होत नसेल त्यांच्याकडे ही माणसं ढुंकूनही बघत नाहीत. ही माणसं आपल्या अवतीभवती, समाजात, गावात, कार्यक्षेत्रात आणि आपल्या गल्लीत खूप आढळतात.ही माणसं कोणताही व्यवहार करताना अगोदर आपला स्वार्थ साधला जातोय की नाही हे पाहतात. मोठ्या पगाराची नोकरी असली तरीही गरीब मजुरांकडून आणि गरीब शेतकऱ्यांकडून पाचशे रुपयांची लाच मागणारे नोकरदार कमी नाहीत. ही माणसं इतकी निर्लज्ज असतात की यांना फक्त संपत्ती आणि पैसा प्रिय असतो. हे लोक विनाकारण कोणाला जवळ करत नाहीत. ही माणसं सर्वत्र आढळतात. हल्ली यांचा जिकडे तिकडे सुळसुळाट सुरू आहे. ही माणसं कमालीची गुप्त कारस्थाने करतात.ज्यांच्या मुळे आर्थिक फायदा होत असेल त्या लोकांसाठी ही माणसं कितीही वेळ देतात, त्यांच्या कार्याचा गौरव करतात. स्वार्थ साधला गेला की हेच लोक अशा लोकांना पुन्हा ओळख सुद्धा देत नाहीत. ही माणसं स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाऊन चुकीचे बोलतात आणि चुकीचे वागतात.अशा लोकांना जन्मदाते वृद्ध आईवडील घरात ओझे वाटतात.पत्नीचे ऐकून आईवडीलांना काही वाईट साईट बोलतात, प्रसंगी आई वडिलांना मारहाण सुध्दा करतात. व्यसने करण्यात ही माणसे आघाडीवर असतात. ही माणसे जातीवादी असतात,आपल्या जातीचा ह्यांना फार पुळका असतो आणि गर्वही असतो. आजकाल अशा वाईट लोकांच्या दुष्कृत्यांच्या बातम्या दररोज वर्तमान पत्रात छापून येतात. अशा माणसांमुळे कौटुंबिक, सामाजिक व मानसिक स्वास्थ्य बिघडत चालले आहे. ही माणसे मुळात फार चतूर व चाणाक्ष असतात.ह्यांना विनाकारण कधी शांत बसता येत नाही! समाज हिताचे व देशहिताचे एक सुध्दा चांगले काम ही माणसे करत नाहीत. ह्यांना दुसऱ्यांना नावे ठेवायची खूप घाण सवय असते आणि स्वतःच्या कधीच न केलेल्या कामाची तोंडभरून स्तुती करायची आवड असते. ही माणसं खरोखरच अकार्यक्षम, आळशी, ऐतखाऊ असतात आणि चारित्र्यवान मात्र नसतात. मनात आल्यावर नको तेथे तोंड खुपसून वाद घालत बसतात. अशी असतात काही माणसं ज्यांच्या तोंडाचा पट्टा कधीच बंद होत नसतो. आता काही माणसं तशी असतात म्हणजे त्याचा अर्थ समजून घेऊ. ही माणसे फार भोळे असतात. यांना स्वार्थ, आचपेच, धूर्तपणा, लबाडी, खोटारडेपणा आणि देखावा या सगळ्या गोष्टी माहीत नसतात. ही माणसं सरळ वागतात आणि सरळ बोलतात. चाणाक्षपणा यांना कधी जमत नाही. जगातील सगळे लोक फार चांगले आहेत असे समजून ते सर्वांसोबत माणुसकीने वागतात आणि नेहमी सत्कर्म करत असतात. आपल्यामुळे कोणाचे वाईट होणार नाही याची फार काळजी घेतात. दुसरा कोणी चुकीचे वागत असेल, चुकीचे बोलत असेल तरीही हे सगळं सहन करतात. कौटुंबिक व सामाजिक ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी हे लोक खूप प्रयत्न करतात. व्यसनी मुलाने दारु पिऊन मारहाण केली तरीही ते गप्प असतात, मुलाने मारले म्हणून कोणाला सांगत सुध्दा नाहीत. अशा व्यसनी मुलाचा अपघात होऊन पाय तुटला तर त्या मुलाची काळजी घेतात, प्रसंगी रडताना दिसतात. परंतु, याच व्यसनी मुलाने दारु पिऊन मारहाण केली होती हे चक्क विसरतात. ही माणसं मनाने खूप चांगले असतात, यांचे हृदय विशाल असते, कोमल व भावनिक असते. कपटीपणा करून भावाने संपत्ती हडपली असेल तरीही हे भाऊ आजारी पडला तर त्याला पहायला जातात. वाईटांसोबत वाईट वागायचे असते हेच त्यांना माहीत नसते. या जगात माणसांची संख्या खूप आहे. परंतु चांगल्या माणसांची संख्या फार कमी आहे. सुहृदयी, कुटुंबवत्सल आणि नातलगांना जीव लावणारी माणसं आजही आहेत म्हणून मानवाचे जीवनचक्र सुरळीत चालू आहे. पृथ्वी जेव्हा निर्माण झाली आणि पृथ्वीवर सजीवांची उत्पत्ती झाली तेव्हा पासून आतापर्यंत या पृथ्वीवर किती माणसे जन्मली आणि किती माणसे मेली याची अचूक संख्या कोणाकडेही उपलब्ध नाही. जन्मणे आणि मरणे, मिळालेले जीवन मनात आले तसे जगणे हेच सर्वत्र चालू आहे. माणसे असतात चित्र विचित्र स्वभावाचे, वेगवेगळ्या विचारांचे आणि निरनिराळ्या वर्तनाचे. माणसं असतात काही आकलनापलीकडची आणि असतात काही कल्पनेपलीकडची. खरंच, माणसं असतात काही अशी आणि काही तशी. मी, तुम्ही, आम्ही आपण सगळे त्यापैकी कोणत्याही एका गटात चपखल बसतो. आणि तीच ओळख आपली खरी ओळख बनते.

# तुळशी विवाह, मांगल्याचा प्रवाह...!!

लग्न किंवा विवाह हा एकूणच भारतीय समाजव्यवस्थेचा घरगुती आणि तितकाच सामाजिक असा लाडका विषय ठरतो.तो केवळ उपचार नाही तर विवाह संस्कार आहे असे सांगून त्याचे महत्त्व आणि अनिवार्यता त्यातून स्पष्ट होते. निदान महाराष्ट्रातल्या तरी अनेक विवाह समारंभांच्या लग्नपत्रिकांवर कार्य पार पाडण्यास श्रीसमर्थ आहेत. परंतु आपण सहपरिवार शुभेच्छा आणि शुभाशीर्वाद देण्यासाठी यावे अशी आग्रहाची विनंती केलेली असते. परंतु विवाहाच्यानिमित्ताने जशा अनेक मुद्यांना महत्त्व प्राप्त होते. तसेच विवाहांची ही परंपरा एक सुदृढ विचारप्रवाहसुद्धा समृद्ध करीत राहते. मग विवाह पार पाडण्यास समर्थ असणाऱ्या ईश्वराचाही विवाह घडवून आणण्याची कल्पना राबवली जाते. म्हणूनच महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये प्रबोधिनी एकादशी ते कार्तिकी पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाहाची एक आगळीवेगळी धूम पाहायला मिळते. प्रत्यक्ष देवाचाच तुळशीशी विवाह लावून अशा मंगलकार्यातून मांगल्याचेच आवर्तन घडवण्याचा प्रयत्न होतो. तुळशीविवाहाचे हे निमित्त आणि त्यातून साधला गेलेला विचार समाज व्यवस्थेलाही बांधून ठेवणारा आणि संस्कृतीशी, पर्यावरणाशी असलेला संबंध अधिक घनिष्ठ करणारा ठरतो. याला केवळ एक कर्मकांड किंवा हौस, उत्साह म्हणून केलेला उपक्रम जरी गृहित धरले तरी त्यातून साधला जाणारा उद्देश खूप व्यापक स्वरूपाचा ठरतो. मग तुळशी विवाहाच्या निमित्ताने मनाचे आणि पर्यावरणाचेही पावित्र्य जपले जाते. श्रीकृष्णाशी लागणारा तुळशीचा विवाह म्हणजे ब्रह्मांडाचा आणि देहरूपी पिंडाचा काही ना काही संबंध असल्याचे दाखवून जातो. श्रीकृष्णाला तुळस प्रिय असल्याचे पुराणांमधून सांगितले गेले. आणि भगवंताला ज्या ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या सगळ्या व्यक्ती आणि समाजाच्या हिताचाच विचार करणाऱ्या ठरतात याबद्दलही दुमत राहत नाही. अशा कितीतरी वनस्पती आहेत की ज्याचे भारतीय संस्कृतीने



पूजाअर्चेच्या माध्यमातून महत्त्व सांगितलेले आहे.

**● पावित्र्य आणि पर्यावरण...**

अन्य सगळ्या वनस्पतींमध्ये तुळशीला मिळालेले हे महत्त्व स्पष्ट करते. तिचा आरोग्यदृष्ट्या होणारा उपयोग सर्वाधिक प्राणवायू देणारी वनस्पती आणि या तुळशीला नित्य देवपूजेमध्ये मिळालेले महत्त्व अशा कारणांमुळे नकळतपणे या वनस्पतीविषयी पावित्र्यभाव जागवला जातो. रात्रीच्यावेळीसुद्धा सर्वाधिक प्राणवायू आणि ओझोनवायू देणारी ही वनस्पती आहे असे सांगितले गेले आहे. आयुर्वेदामधून तुळशी कशी आरोग्यवर्धक आणि व्याधीनाशक आहे हे प्रकर्षाने सांगितले गेले. कदाचित म्हणूनच




महिना दीड महिना वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या गळ्यातही तुळशीच्या माळेला महत्त्व मिळाले असावे. प्रत्यक्ष पांडुरंगाला तुळशीचा हारच प्रिय असतो. म्हणूनच अनेक संतांनी आपापल्या अभंगांमधून तुळशीविषयी व्यक्त केलेला आदरभाव हा पावित्र्य, श्रद्धा आणि संकल्पांनाही बळ देणारा आहे. तुकाराम महाराजांनी

**...तुळशीहार गळा कासे पितांबर**
**आवडे निरंतर हेचि ध्यान !!**

असे म्हणून पांडुरंगाची स्तुती केली. संत नामदेवांनीसुद्धा तुळशीमहात्म्य सांगताना म्हटले आहे की,

**तुळशीविण ज्याचे घर**
**ते जाणावे अघोर।**
**तेथे वसती यम किंकर**
**आज्ञा आहे म्हणोनी।**
**तुलसी वृंदावन ज्याचे घरी**
**त्यासी प्रसन्न श्रीहरी।**

एवढेच नाही तर आपल्या मनाच्या संकल्पांसाठीसुद्धा तुळशीची आराधना ही समृद्धता देणारी ठरते. नामदेवांनीच म्हटले आहे की,

**तुळस असे ज्याचे घरी**
**लक्ष्मी वसे त्याचे घरी।**
**जे तुळशी घालिती उदका**
**ते नर पावती ब्रह्मसुखा।**

म्हणजे तुळशीच्या उपासनेतून जागवला जाणारा मांगल्यभाव हा समृद्धतेलाही आमंत्रण देणारा ठरतो. स्वाभाविकपणे ही मानसिक शुद्धता शारीरिक व्याधींनासुद्धा दूर ठेवायला नकळतपणे दूर करते. तुळशीशी नित्यनेमाने येणारा संपर्क किंवा पंचामृत, प्रसाद, या माध्यमातून होणारे तुळशीचे सेवन हेसुद्धा शरीरासाठी पोषक ठरते. वारकऱ्यांनी या तुळशीच्या माळेला आपल्या कंठाशी जपले आहे. यासाठीच तुकाराम महाराज म्हणतात की...

**आम्ही तेणे सुखी।**
**म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी।**
**कंठी मिरवा तुळशी।**
**व्रत करा एकादशी।** म्हणजेच अनेक अर्थांनी जर सुखाचा अनुभव घ्यायचा असेल तर गळ्यामध्ये तुळशीमाळ असणे किती महत्त्वाचे आहे. हेच त्यातून स्पष्ट होते.

**● लाभदायक घरोबा...**

दरवर्षी महाराष्ट्रात घडून येणारा हा तुळशीविवाहाचा उपक्रम उत्सव म्हणून साजरा होतो. पण त्यानिमित्ताने घडून येणारी पर्यावरण जागृतीसुद्धा महत्त्वाची ठरते. भारतात अनेकानेक वनस्पतींची पूजाअर्चा होत असते. मग वड पिंपळांपासून ते औदुंबरापर्यंत किंवा आंब्यापासून ते आवळ्याच्या झाडापर्यंत हे वृक्ष किंवा वनस्पती संवर्धन सांगितले गेले आहे. परंतु तुळशीला मात्र अधिक महत्त्व मिळालेले आहे. स्वाभाविकपणे अनेक उत्सवांशी जशा लोकभावना जोडल्या जातात तशाच लोकभावना या तुळशीविवाहाशीसुद्धा जोडल्या गेल्या आहेत. निदान महाराष्ट्रात तरी अशी समजूत आहे की घरातल्या मंगलकार्यासाठी तुळशी विवाह केला जावा किंवा तुळशी विवाह झाल्यानंतरच अन्य विवाहांचे मुहूर्तही सुरू होतात. केवळ महिला वर्गच नाही तर पुरुषांसाठीसुद्धा रोजचे तुळस पूजन हे भाग्यवर्धक म्हटले आहे. त्यातला मानसिक शांततेचा आणि चांगल्या आरोग्याचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो.

बाराही मास आणि कुठेही उपलब्ध होणारी ही तुळशी जवळपास सगळ्या व्याधींवर परिणाम करणारी ठरते. आधुनिक वैद्यकशास्त्रात त्याला जरी महत्त्व नसले तरी आयुर्वेदामधून तुळशीचा काढा गौरवला गेला आहे. ज्या गोष्टीसाठी कोणतेही पैसे मोजावे लागत नाहीत. सहजपणे उपलब्ध होणारी वनस्पती आणि तिच्याशी नियमितपणे असणारा संपर्क हा जर आरोग्याला पोषक ठरत असेल तर त्याचा उपयोग तितक्याच सहजपणे करण्याची भारतीयांची मनस्थिती असते. प्रसन्नता आणि त्यातून सकारात्मक मानसिकतेची जोपासना करणारी ही तुळस यासाठीच सर्वाधिक महत्त्व ठेवून आहे यात काही शंका राहत नाही. म्हणूनच अशा या तुळशीविवाहाच्या संकल्पनेतून तिच्याशी केला जाणारा घरोबा लाभदायक ठरलेला आहे.

# उडता ‘महाराष्ट्र’ ??

गेल्या काही महिन्यांत राज्यात अमली पदार्थाचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असल्याचे पुरावे हळूहळू समोर येऊ लागले आहेत. मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने नुकतीच नालासोपारा येथील अमली पदार्थ बनवणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून सुमारे १४ कोटीहून अधिक किमतीचे मेफेड्रोन अर्थात एम.डी. जप्त केले. अमली पदार्थाच्या साठ्यासह अमली पदार्थ बनवण्यासाठी लागणारे साहित्यही या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात कह्यात घेण्यात आले. याच रॅकेटशी संबंधित एकाला पोलिसांनी ५० लक्ष किमतीच्या अमली पदार्थासह बारामतीहून नुकतीच अटक केली होती. ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ आणि बदलापूर येथून जप्त केलेला सुमारे ₹१४३ कोटी बाजारमूल्य असणारा अमली पदार्थांचा साठा पोलिसांनी हल्लीच नष्ट केला. मीरा-भाईंदर,वसई-विरार पोलिसांनीही विविध धाडी टाकून पकडलेला सुमारे ३० कोटी मूल्य असलेला अमली पदार्थांचा साठा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नष्ट केला. फेब्रुवारी ते जून महिन्यापर्यंत राज्याच्या अमली पदार्थविरोधी पथकाने चार हजार १३१ कोटींचा अमली पदार्थांचा साठा जप्त केला. अमली पदार्थविरोधी पथकांनी राज्यात केलेल्या कारवाईत शेकडो ठिकाणी छापे टाकले आहेत. या छाप्यादरम्यान ड्रग्ज माफियांशी हितसंबंध असलेल्या सहा पोलिसांना बडतर्फ करण्यात आले आहे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कुरिअरमार्फत, इन्स्टाग्राम, फेसबुक चॅट किंवा अन्य मॅसेंजरच्या माध्यमातून अमली पदार्थांची विक्री केली जात असल्याचे उघड झाले आहे. कधीकाळी पंजाबमध्ये अमली पदार्थाचे जाळे मोठया प्रमाणात पसरले होते तेव्हा पंजाबला 'उडता पंजाब' असे नाव देण्यात आले होते. आजमितीला महाराष्ट्राची वाटचाल त्याच दिशेने होऊ लागली आहे. राज्यातील कारखाने बंद करून अन्य राज्यांत स्थलांतरित झालेल्या कंपन्याचे सध्या ओसाड पडलेले कारखाने आणि त्यांच्या शेड्स अमली पदार्थ बनवण्याची मुख्य केंद्रे झाली आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ तयार केले जातात. राज्याच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने मागील दोन वर्षांत केलेल्या कारवायांत असे अनेक कारखाने उध्वस्त केले आहेत. यासंदर्भात १ हजाराहून अधिक खटले दाखल करण्यात आले आहेत. तर दीड हजाराहून अधिक अमली पदार्थाच्या तस्करांना अटक केली आहे. ज्यांच्याकडून हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. या ठिकाणी तयार होणारे अमली पदार्थ राज्यभरात पसरवण्यासाठी स्वतंत्र टोळ्या कार्यरत आहेत. काही वर्षांपूर्वी अन्य देशांतून सागरी मार्गाने अमली पदार्थ यायचे आज मात्र राज्यात ठिकठिकाणी अमली पदार्थाचे कारखाने तयार झाले आहेत. कधी काळी धनदांडग्याच्या घरात आढळणारे अमली पदार्थांचे शौकीन आता गावांतून, चाळी आणि झोपडपट्ट्यामध्येही आढळू लागले आहेत. काही शाळा महाविद्यालयामध्येंही अमली पदार्थांचे जाळे विखूरले आहे. ज्यामध्ये महाविद्यालयीन तरुणांसह शाळकरी मुलांचेही बळी जाऊ लागले आहेत. अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्यांना कशाचेही भान उरत नाही. वेळेत अमली पदार्थ विकत घेण्यासाठी पैसे न देणाऱ्या आई-वडिलांच्या, जवळच्या नातेवाईकांच्या हत्या केल्या गेल्याचींही प्रकरणे राज्यात घडली आहेत. स्टेटस राखण्यासाठी, मित्र मंडळीच्या हट्टापायी केलेले अमली पदार्थाचे सेवन पुढे ते घेणाऱ्याचाच बळी घेते. देशाचे भवितव्य असलेल्या तरुणाईला पडलेला अमली पदार्थांचा विळखा राज्याच्या प्रमुख शहरांसह आता ग्रामीण भागातही हातपाय रोवू लागला आहे. शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या आपल्या पाल्याला या संकटापासून रोखयचे असेल, तर आपल्या मुलांवर नीट लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्या मुलांचा मित्रपरिवार कसा आहे, तो कोणाच्या संपर्कात अधिक वेळ असतो, त्याच्या वर्तणुकीत होणारा पाल्ट यांवर पालकांनी लक्ष ठेवायला हवे. अमली पदार्थाचे सेवन हे केवळ आपल्यासाठीच नव्हे, तर समाज आणि पर्यायाने देशासाठी घातक आहे याची जाण मुलांना येण्यासाठी त्यांच्यावर नैतिक मूल्यांचे संस्कार लहानपणापासून करायला हवेत. त्यांच्यामध्ये समाज, राष्ट्र आणि धर्म यांविषयी आवड निर्माण करून त्यासंदर्भातील अभिमान जागवायला हवा!

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# डॉ.होमी जहांगीर भाभा !

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते.

डॉ.होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले. त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला.

गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुलकण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली.

या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले.

२४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ज्ञानदेव सुंबरे यांचा खासदार निलेश लंके यांच्या हस्ते सत्कार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील हरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्जुलेहार्या येथिल हरेश्वर माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक व टाकळी ढोकेश्वर येथिल रहिवासी ज्ञानदेव सुंबरे यांनी मांडओहळ धरणात सलग न थांबता ५ तास पोहून १४ किलोमीटर अंतर पार करीत नवा उल्लेखनीय विक्रम केल्याबद्दल ज्ञानदेव सुंबरे यांचा निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने खासदार निलेश लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. पारनेर येथिल डॉ. खासदार निलेश लंके प्रतिष्ठानच्या संपर्क कार्यालयात हा सन्मान करण्यात आला. यावेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, जिल्हा परिषदेचे सदस्य बाळासाहेब हराळ, राळेगणसिद्धी सरपंच जयसिंग मापारी, संपतराव म्हस्के, नगरसेवक योगेश मते, चेअरमन सचिन साठे, सरपंच शिवा पाटील, नेप्तीचे माजी सरपंच संजय जपकर उपस्थित होते. ज्ञानदेव सुंबरे यांनी दिवाळीच्या अभ्यंगस्नानाच्या दिवशी भल्या पहाटे मांडओहळ धरणात पोहण्यास प्रारंभ केला होता. पारनेर तालुक्यातील मांडओहळ धरण हे सर्वात मोठे धरण असून तरीही सुंबरे यांनी पुर्व पश्चिम अशी १४ किलोमीटर अंतर न थांबता नवा विक्रम करूनच ते धरणाच्या बाहेर पडले. वयाच्या पन्नाशीत नवा विक्रम करणारे सुंबरे हे तालुक्यातील एकमेव ध्येयवेडे शिक्षक ठरले आहेत. त्यांनी याआधी फेब्रुवारी २०२३ मध्ये २१ किमीची अहिल्यानगर रायझिंग मॅरेथॉन पूर्ण करत जिल्ह्यात तिसरे स्थान पटकावले आहे. म्हणूनच खासदार निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने खासदार निलेश लंके यांनी या सर्व बाबींचा विचार करत ज्ञानदेव सुंबरेंचा अभिनंदन करून हा सत्कार करण्यात आला आहे.

## राजुरा येथे धनोजे कुणबी समाजाचा वार्षिक सोहळा उत्साहात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, राजुरा (चंद्रपूर) :** राजुऱ्यातील धनोजे कुणबी समाजाचा वार्षिक व कोजागिरी संयुक्त सोहळा उत्साह, एकोपा आणि सांस्कृतिक रंगानी उजळून निघाला. धनोजे कुणबी सभागृहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी भूषविले. प्रमुख अतिथी खा.प्रतिभा धानोरकर, आ.देवराव भोंगळे, माजी आमदार सुदर्शन निमकर, ॲड.मूर्लीधर देवाळकर, डॉ. मारोतराव पिंपळकर, प्राचार्य दौलत भोंगळे, सतीश धोटे, दिनकर डोहे, प्रा.मनिषा चटप, मनोज पावडे, केशव ठाकरे, दिपाली हिंगाणे, दिपक डोहे, उध्दव लांडे, प्रशांत साळवे, संतोष देरकर, भाऊराव बोबडे, अनिल आवारी, संदिप कोंडेकर, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी खा. प्रतिभा धानोरकर यांनी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक करीत राजुऱ्यातील कुणबी समाज हा एकतेचा आदर्श आहे, असे सांगितले. आ. देवराव भोंगळे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासिकेसाठी ४० लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा करुन उपस्थितांची मने जिंकली. यापुढेही समाजकार्यासाठी तत्पर असल्याचे आ. भोंगळे यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात ॲड. वामनराव चटप यांनी समाजाच्या शैक्षणिक वाटचालीचा मागोवा घेत समाजातील अनेक व्यक्ती उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर अधिनस्थ असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना ॲड. चटप यांनी हे प्रशस्त व सुंदर धनोजे कुणबी सभागृह उभे करण्यामागे अनेक समाजबांधवांचे अथक प्रयत्न आहेत. काहींनी पदरमोड करुन स्वप्न सत्यात उतरवले. आजच्या लोकप्रतिनिधींनी स्वत:च्या निधीतून समाजाच्या प्रगतीसाठी हातभार लावावा आणि या भवनाला मदत करण्याचे आवाहन केले.

या आवाहनाला प्रतिसाद देत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी एक लाख रुपयांचा निधी स्वत: देण्याचे त्वरित आश्वासन दिले. याप्रसंगी डॉ. मारोती पिंपळकर यांनी समाजासाठी १ लाख ११ हजार १११ रुपयांचा निधी चेकद्वारे प्रदान केला. यावेळी डॉ. पिंपळकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान स्व. बाळू धानोरकर यांच्या निधीतून बांधलेल्या इमारतीचे उद्घाटन खा. प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक देवराव निब्रड, संचालन केतन जुनघरी व गायत्री उरकुडे यांनी केले. सभागृहात समाजबांधव, महिला आणि तरुणाईचा उत्साह दाटून आला होता. कोजागिरीच्या चांदण्यात उजळलेला हा सोहळा समाजाच्या ऐक्याची नवी झळाळी ठरला. या कार्यक्रमात समाजबांधवांची मोठी उपस्थिती होती.

## पुणे-वाशिम-पुणे रात्रसेवा फेरी ऑनलाईन आरक्षणामध्ये उपलब्ध




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, लोणार (बुलडाणा) :** जागतिक वारसा असलेले लोणार येथुन पुणे करीता राज्य परिवहन महामंडळाची रात्रसेवा बसफेरी प्रवाशांना उपलब्ध नव्हती. यामुळे प्रवाशांना बसफेऱ्या बदलुन किंवा खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत होता. प्रवाशांची नेहमीची प्रवासाची गैरसोय दुर करण्यासाठी पुणे विभागाअंतर्गत येत असलेल्या शिवाजीनगर आगाराकडुन पुणे-वाशिम-पुणे हि रात्रसेवा बसफेरी दि.२५ सप्टेंबर २०२५ पासून सुरू करण्यात आली असून सदर फेरी नियमित सुरू असुन हि फेरी ऑनलाईन आरक्षण प्रणाली मध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध आहे. सदर फेरी रिसोड आणि लोणार या मार्गावर एकमेव रात्रसेवा बसफेरी असून पुणेकडे जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांना रिसोड आणि लोणार या ठिकाणावरुन ऑनलाईन आरक्षण प्रणाली मध्ये सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. प्रवाशांना विनंती आहे की, सदर सेवेचा लाभ घ्यावा व सदर फेरी प्रवाशांच्या सेवेसाठी नियमित उपलब्ध राहण्यास सहकार्य करावे असे आवाहन प्रवाशी सेवा संघटना, लोणार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# आमदार काशिनाथ दातेंची उपमुख्यमंत्री अजित दादांकडे मागणी

### कान्हुर व पारनेर मंडलातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेऊन पारनेर व कान्हुर पठार मंडळातील शेतकऱ्यांना नुकसान होऊन ही राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांमुळे भेटत नसलेल्या नुकसान भरपाईच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करत सबंधित मंडळातील शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

नामदार अजितदादा पवार यांना देण्यात आलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पारनेर तहसिल अंतर्गत तालुक्यात एकूण १२ महसूल मंडळे आहेत. यापैकी १० महसूल मंडळे अतिवृष्टी निकषात बसून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत आहे. तथापि, पारनेर व कान्हुर पठार महसूल मंडळे तांत्रिक कारणास्तव एका दिवशी ६५ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद नसल्याने निकषात समाविष्ट झालेली नाहीत. परंतु तालुक्याचा एकूण सरासरी पर्जन्यमान २१३ टक्क्यांपेक्षा अधिक असून, या दोन्ही मंडळांमध्येही शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे.सबंधित गावांतील नुकसानीची महसूल व कृषी विभागाकडून पाहणी व पंचनामे पूर्ण करण्यात आलेले आहेत. तसेच मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मा.पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शिफारशीने या दोन्ही महसूल मंडळांचा विचार करण्याचा प्रस्तावही शासनाकडे सादर केलेला आहे. सबंधित नुकसानीचा लाभ मिळत नसल्याने या दोनही मंडळातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत असून त्यांना नुकसान भरपाई मिळणे अत्यावश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

संबंधित शेतकऱ्यांच्या नाराजीचा व वास्तव परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून पारनेर व कान्हुर पठार महसुल मंडळातील शेतकऱ्यांना तालुक्यातील इतर मंडळातील शेतकऱ्यांप्रमाणेच विशेष बाब म्हणून मंजुरी देऊन नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित दादांसह मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद आबा पाटील यांचेकडे करण्यात आली असून नामदार अजितदादा पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सबंधित विषयी आढावा घेवून उचित निर्णय घेणार असल्याबाबत यावेळी स्पष्ट केले.

**आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# पारनेर तालुक्यातील पर्यटनस्थळांच्या सुशोभीकरणासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर

## ढोकेश्वर, दुर्गादेवी, गणेश खिंड, चुंभळेश्वर, शिवतीर्थ या ५ धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत तालुक्यासाठी तब्बल २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिली असून यानिमित्ताने पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक पर्यटनस्थळांच्या सुशोभीकरणाला आता नवी गती मिळणार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागकडून मंजूर झालेल्या या निधीतून मौजे सुपा येथील शिवतीर्थ चौक व परिसर, मौजे ढोकी येथील ढोकेश्वर मंदिर परिसर, मौजे नारायणगव्हाण येथील चुंभळेश्वर मंदिर परिसर, मौजे ढवळपुरी येथील दुर्गामाता मंदिर परिसर आणि मौजे पुणेवाडी येथील गणेश मंदिर व गणेश खिंड परिसर या पाच ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचे सांगत प्रत्येक ठिकाणासाठी ४० लाख रुपये असा एकूण २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

या मंजुरीमुळे पारनेर तालुक्यातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असून, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, सुविधा आणि पर्यटकांच्या सोयींमध्ये मोठी वाढ होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला असून या कामांच्या मागणी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक विचार करून मंजुरी मिळविण्यासाठी केलेल्या सहकार्याची प्रांजळपणे कबुली देत आमदार काशिनाथ दाते यांनी पारनेर तालुक्यातील जनतेच्या वतीने सर्वांचे जाहीर आभारही यावेळी व्यक्त केले.

या निर्णयाबद्दल आमदार काशिनाथ दाते यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र शासनाचे मन:पूर्वक आभार व्यक्त करताना सांगितले की, या निधीच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनस्थळांना नवी झळाळी प्राप्त होईल तसेच ग्रामस्थांच्या दीर्घकालीन अपेक्षांनाही न्याय मिळणार असून महायुती सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार असल्याची तालुक्यात रुजलेली जनभावना अधिकाधिक वाढीस लागण्यास मदत होणार आहे.

आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नांमुळे आमच्या चुंभळेश्वर मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी मिळालेला निधी हा गावासाठी अभिमानाचा क्षण आहे. त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या विकासाच्या कामांना प्राधान्य दिले असून, त्यांच्या नेतृत्वामुळे नारायणगव्हाण गावासह संपुर्ण मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार आहे. दाते सरांचे कार्य खरंच लोकप्रतिनिधी कसे असावेत याचं उत्तम उदाहरण आहे.

**– सुरेश बो-हुडे , नारायण गव्हाण**

सुपा येथील शिवतीर्थ चौक व परिसराच्या सुशोभीकरणासाठी मिळालेला निधी हा गावाच्या सौंदर्यवृद्धीबरोबरच स्थानिकांच्या अभिमानाचा विषय आहे. आमदार दाते सरांचे नेतृत्व म्हणजे विकासाच्या वाटचालीला दिशा देणारे नेतृत्व असुन गेल्या वर्षभरात त्यांच्या माध्यमातून मतदारसंघाच्या विकासाला मिळत असलेली गती पाहुन त्यांच्या निवडीचा एक मतदार म्हणून सार्थ अभिमान वाटतो.

**सागर मैड (भाजपा सरचिटणीस पारनेर – सुपा मंडल)**

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांना दिला जोमाने लढण्याचा संदेश - हर्षवर्धन सपकाळ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, बल्लारपूर (चंद्रपूर) :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या बल्लारपूर शहरात प्रथम आगमनावेळी प्रदेश सचिव घनश्याम मुलचंदानी यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर काँग्रेस अध्यक्ष देवेंद्र आर्य यांच्या नेतृत्वाखाली कांग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त स्वागत करून परिसर दुमदुमवून टाकला. गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी दौर्यावर असताना हर्षवर्धन सपकाळ हे परतीच्या प्रवासात सायंकाळी बल्लारपूराला थोडा वेळ थांबले.

**प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचे बल्लारपुरात भव्य स्वागत**



नगर परिषद चौकात स्थित रयतेचे राजा छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना भेट दिली. यावेळी बल्लारपूर शहर व तालुक्यातील काँग्रेसच्या नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या भेटीदरम्यान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे गांभीर्याने पाहण्याचे, पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचे आणि आगामी निवडणुकांमध्ये जोमाने काम करण्याचे आवाहन केले.

जनतेचा विश्वास आणि पक्षाची विचारधारा घराघरात पोहोचवा, असे मार्गदर्शन त्यांनी उपस्थितांना केले. यावेळी बल्लारपूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गोविंदा उपरे, माजी अध्यक्ष अब्दुल करीम, भास्कर माकोडे, माजी नगराध्यक्ष छाया मडावी, दिलीप माकोडे, डॉ.सुनील कुलदीवार, डॉ.अनिल वाढई, इस्माईल ढाकवाला, चेतन गेडाम, प्राणेश अमराज, नरेश आनंद, पवन मेश्राम, वासुदेव येरगुडे, महमूद पठाण सह प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घोषणांनी परिसर दुमदुमला आणि वातावरणात उत्साह संचारला. स्थानिक कार्यकर्त्यांनीही प्रदेशाध्यक्षांच्या या भेटीला ऐतिहासिक ठरवत, प्रदेशाध्यक्षांचा ऊर्जावान संदेश म्हणजे काँग्रेसला नवचैतन्य देणारा क्षण अशी भावना व्यक्त केली.

# घुग्घुस शहराला मिळणार मुबलक पाणी पुरवठा

## अमृत २.० योजनेतून ९३.९८ कोटींचा निधी मंजूर; मुख्यमंत्री यांची भेट घेत आ.जोरगेवार यांनी केली चर्चा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** घुग्घुस शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला नवा जीवदान मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने केंद्र पुरस्कृत 'अमृत २.० अभियान' अंतर्गत घुग्घुस नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी एकूण ९३.९८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. शासनाचा निर्णय नगर विकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून, यामुळे घुग्घुस शहराला शुद्ध, स्वच्छ आणि मुबलक पाणी पुरवठा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई मंत्रालयात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निधीबद्दल मन:पूर्वक आभार व्यक्त केले. या भेटी दरम्यान घुग्घुस शहरातील पाणीपुरवठा प्रकल्प, मतदारसंघातील विविध प्रलंबित विकास कामे आणि शहराच्या सर्वांगीण विकास संदर्भात सविस्तर चर्चा झाली.



या प्रकल्पासाठी केंद्र शासनाचा हिस्सा ४५ टक्के, राज्य शासनाचा हिस्सा ४५ टक्के आणि नगरपरिषदेचा (स्वतः च्या संस्थेचा) हिस्सा ५ टक्के इतका असणार आहे. प्रकल्पाचे काम कार्यादेश मिळाल्यानंतर १८ महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक राहणार असून, त्याचे कार्यान्वयन घुग्घुस नगरपरिषद अधिकारी यांच्या देखरेखीखाली करण्यात येणार आहे. मागील काही वर्षांपासून घुग्घुस शहराला पाण्याच्या टंचाईचा तीव्र सामना करावा लागत होता. अनेक प्रभागांमध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या प्रकल्पामुळे घुग्घुस शहरात अखंड, शुद्ध आणि मुबलक पाणीपुरवठा होणार असून, नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीची पूर्तता होणार आहे. भेटीनंतर बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले, घुग्घुससाठी अमृत २.०९ योजनेतून मिळालेला निधी हा ऐतिहासिक निर्णय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. या निर्णयामुळे घुग्घुस शहराचा पाणीपुरवठा प्रश्न कायम स्वरूपी सुटेल आणि शहराच्या विकासाला गती मिळेल. मुख्यमंत्री यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांना प्राधान्याने गती देण्याचे आश्वासनही दिले आहे. आगामी काही महिन्यांत प्रकल्पाच्या कामांना सुरुवात होऊन नागरिकांना याचा थेट लाभ मिळणार असे ते म्हणाले.

# १६० ग्रॅम एमडी ड्रग्जसह दोन आरोपी अटकेत; १६ लाख १२ हजार ५०० रु. मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली होती की, दोन व्यक्ती हे चंद्रपूर शहरात मोठ्या प्रमाणात मादक पदार्थाची तस्करी करीत असल्याची माहिती मिळताच सापळा रचून स्थानिक गुन्हे शाखेनी कारवाई करून दिपक कृष्णा वर्मा (वय २८, रा.संजयनगर, चंद्रपूर) व आशिष प्रकाश वाळके (वय ३०, रा. मित्रनगर, चंद्रपूर) हे पांढऱ्या रंगाच्या डिजायर कार (क्र. एमएच- ४९ एएस-२७०४) मधून अंमली पदार्थ घेऊन येत आहेत. त्यानुसार, फॉरेस्ट अकादमी समोर स्थानिक गुन्हे शाखेने नाकाबंदी उभारली, नाकाबंदी दरम्यान संबंधित




वाहन आल्यानंतर पोलिसांनी ते थांबवून तपास केला असता, वाहनातून एमडी (मेफोड्रॉन) ड्रग पावडर आढळली. यावरून दोन्ही संशयितांना ताब्यात घेऊन रामनगर पोलिस ठाण्यात एन.डी.पी.एस. ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने मोठी धडक कारवाई केली आहे. यात चंद्रपूर शहरातील वन (फॉरेस्ट) अकादमी, मुल रोड परिसरात नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी दोन तरुणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्या कारमधून तब्बल १६० ग्रॅम एमडी (मेफोड्रॉन) पावडर आणि एकूण १६ लाख १२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सपोनि दिपक कांक्रेडवार, पोउपनि सर्वेश बेलसरे, पोउपनि सुनिल गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, रजनिकांत पुठ्ठावार, दिपक डोंगरे, सतिश अवथरे, शशांक बदामवार, हिरालाल गुप्ता, अजित शेंडे, इम्रान खान, किशोर वाकाटे, या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वी पार पाडली.

# थोडक्यात

## युवा आशियाई कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक विजेती सेरेना म्हसकरचा गौरव



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२९, घाटकोपर (मुंबई) :** जिल्हा क्रीड़ा अधिकारी कार्यालय,मुंबई उपनगर मार्फत बुधवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी तिसऱ्या युवा आशियाई कबड्डी स्पर्धेत भारताला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या भारतीय संघातील मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कु.सेरेना सचिन म्हसकर हिचा आज विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी आणि जिल्हाधिकारी सौरभ कटियार (मुंबई उपनगर) यांच्या हस्ते सन्मानपत्र आणि गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी सौरभ कटियार मुंबई उपनगर यांनी भविष्यात सेरेनाला तिच्या क्रीडाजिवनासाठी आवश्यक ती सर्व मदत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येईल अशी ग्वाही दिली. सेरेनासोबत तिचे प्रशिक्षक अमित ताम्हणकर, आई श्रीमती मेघाली म्हसकर (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त) आणि वडील सचिन म्हसकर (आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू) उपस्थित होते. सदर कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती रश्मी आंबेडकर व क्रीडा कार्यकारी अधिकारी प्रीती टेमघरे उपस्थित होत्या.

# डहाणूतील अशोक भोईर यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर पक्षप्रवेश

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा पार

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२९, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नवीन प्रवेशाचा ओघ सुरू झाला आहे. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुका जवळ आल्याने विविध पक्षांतील नेते आणि कार्यकर्त्यांचा ओढा राष्ट्रवादीकडे वाढत असून पक्ष संघटनाही जोमाने उभारली जात आहे. या पार्श्वभूमीवर डहाणू तालुक्यातील बहुजन विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष तसेच शिवसेनेचे माजी तालुका अध्यक्ष अशोक भोईर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत भोईर यांनी पक्षाचा झेंडा हातात घेत प्रवेश केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष आनंद ठाकूर, युवा जिल्हाध्यक्ष करण ठाकूर, डहाणू तालुका अध्यक्ष विपुल राऊत, तसेच हरेश मुकणे यांच्यासह मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अशोक भोईर यांनी बहुजन विकास आघाडीत कार्यरत असताना ग्रामीण भागात मोठे संघटन निर्माण केले होते. मात्र, पक्षात स्थानिक पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतले जात नाही, वरिष्ठ नेत्यांकडून सहकार्य मिळत नाही आणि जनतेच्या सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांनी असंतोष व्यक्त केला. ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी आणि जनतेच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस हा योग्य पर्याय असल्याने मी हा निर्णय घेतला आहे, असे भोईर यांनी सांगितले. त्यांच्या प्रवेशामुळे डहाणू तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष आनंद ठाकूर यांनी व्यक्त केला. तसेच आगामी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला या नव्या शक्तीमुळे मोठी उभारी मिळेल, असे मत ही त्यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा आता डहाणू तालुक्यात नव्या जोमाने फडकताना दिसत आहे.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते लखन हिकरे यांचा भाजपमध्ये प्रवेश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** भारतीय कोळसा मजदूर संघ वणी क्षेत्राचे क्षेत्रीय अध्यक्ष तसेच काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते लखन मारोती हिकरे आणि सूरज हिकरे यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी आ. किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत त्यांनी हा प्रवेश केला. आ.किशोर जोरगेवार यांनी पक्षाचा दुपट्टा टाकून त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, घुग्घूस शहर अध्यक्ष संजय तिवारी, विधानसभा अध्यक्ष दशरथ सिंह ठाकूर, बलराम डोडाणी, महामंत्री रवी गुरनुले, घुग्घूस शहर उपाध्यक्ष अनिल बाम, घुग्घूस युवा मोर्चा अध्यक्ष संतोष नुने, घुग्घूस महामंत्री साजन गोने, युवा मोर्चा महामंत्री स्वप्निल वाढई, हेमंत उरकुडे, गणेश पिंपळकर आदींची उपस्थिती होती.

प्रवेशानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना आ.किशोर जोरगेवार म्हणाले की, भारतीय कोळसा मजदूर संघाचे क्षेत्रीय अध्यक्ष आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते लखन हिकरे तसेच सूरज हिकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. पक्षाच्या जनविकास आणि राष्ट्रहिताच्या विचारधारेवर चालत ते जनहितासाठी कार्य करतील, असे ते म्हणाले. भाजपमध्ये प्रवेशानंतर लखन हिकरे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष ही विकास आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी पक्ष संस्था आहे. या विचारधारेत सहभागी होत मी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा संकल्प घेतला आहे. त्यांच्या सोबत सूरज हिकरे यांच्या प्रवेशामुळे स्थानिक युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, घुग्घूस परिसरातील पक्षसंघटन अधिक मजबूत होण्यास हातभार लागणार आहे.

# राजुरा शहरातील निधी मंजूर झालेल्या जागेची अधिकाऱ्यांनी केली पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा नगर परिषद अंतर्गत विविध विकास कामांसाठी तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या निधीच्या कामांची अंमलबजावणी लवकरच सुरू होणार आहे. निधी मंजूर झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज संबंधित ठिकाणांची पाहणी करून कामांच्या आराखड्याचा आढावा घेतला.

या पाहणी वेळी आमदार देवराव भोंगळे यांच्या प्रयत्नांना प्रत्यक्षात यश मिळाल्याचे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले. आ.भोंगळे यांनी मागील काही महिन्यांपासून राजुरा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन व संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून, राजुरा शहराच्या विकासासाठी ५ कोटी रुपयांचा मोठा निधी मंजूर झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, नगर परिषदचे पदाधिकारी तसेच भाजपाचे कार्यकर्ते या पाहणीवेळी उपस्थित होते.

शहरातील रस्ते काँक्रीट व डांबरीकरण करणे, बंदिस्त नाली बांधकाम, सार्वजनिक वाचनालय बांधकाम, समाजगृह बांधकाम, सार्वजनिक ठिकाणांची सुशोभीकरणे अशी विविध कामे या निधीतून करण्यात येणार आहे. निधीच्या मंजुरी बद्दल बोलताना आ. देवराव भोंगळे म्हणाले, राजुरा शहराचा सर्वांगीण विकास हा माझा ध्यास आहे. नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात म्हणूनच हा निधी मंजूर करून घेतला आहे.

लवकरच या सर्व कामांचा शुभारंभ करण्यात येईल,असे त्यांनी सांगितले. राजुरा शहरातील नागरिकांमध्ये या



## आ.भोंगळे यांच्या प्रयत्नांना यश

विकास कामांविषयी उत्साहाचे वातावरण असून,अनेकांनी आ. भोंगळे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

राजुरा शहरातील विविध विकासकामे करण्यासाठी निधी मंजूर झालेल्या संबंधित जागेची पाहणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता विजय डाळ, शाखा अभियंता वंदना कोवे, हेमंत मानापुरे, अश्विनी पाटील, जयश्री कातकडे, भाजपा राजुरा शहराध्यक्ष सुरेश रागीट, महामंत्री मिलिंद देशकर, भाजयुमोचे शहराध्यक्ष प्रफुल घोटेकर, आदिवासी मोर्चाचे अध्यक्ष नितीन सिडाम, युमोर्चाचे महामंत्री स्वप्निल पहानपटे, महेंद्र बुरडकर, नितीन वासाडे, प्रदीप मोरे, गणेश रेकलवार, रवी लेकलवार, राकेश आदे, तुषार कोरटे, कृष्णा मेकलवार, यांचेसह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंचूरसह राज्यातील कृषी विक्रेत्यांचा एकदिवसीय लाक्षणिक बंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :** राज्य सरकारने खत, बियाणे व कीटकनाशक विक्रीसाठी सुरू केलेल्या साथी पोर्टल ॲप च्या सक्तीच्या अंमलबजावणीविरोधात विंचूरसह मालेगाव, नाशिक, पुणे पूर्ण राज्यातच ॲग्रो डीलर्स असोसिएशनतर्फे एकदिवसीय लाक्षणिक बंद पाळण्यात आला. या बंददरम्यान सर्व कृषी केंद्रे बंद ठेवून विक्रेत्यांनी सरकारच्या निर्णयाचा निषेध नोंदवला. कृषी विक्रेत्यांचे म्हणणे आहे की, साथी ॲपद्वारे विक्री करणे अत्यंत जाचक आणि अव्यवहार्य असून, यामुळे शेतकऱ्यांना आवश्यक खत, बियाणे व कीटकनाशके वेळेवर मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी शेतीकाम ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असोसिएशनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, साथी ॲप रद्द करून पूर्वीप्रमाणे विक्री करण्यास परवानगी द्यावी. अन्यथा हे आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या बंदामध्ये निफाड तालुक्यातील सर्व कृषी विक्रेते सहभागी झाले होते. विक्रेत्यांचे म्हणणे आहे की, हा लाक्षणिक बंद शेतकऱ्यांच्या अडचणी सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी करण्यात आला आहे.

# एसटीच्या ताफ्यात दाखल होणार तब्बल ८ हजार ३०० नव्या बसेस

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२९, मुंबई :** किफायतशीर आणि परवडणारा प्रवास म्हणून एसटी बसला प्राधान्य दिलं जातं. अनेक शासकीय योजनांमुळे एसटीतून सवलतीच्या दरात प्रवास करता येत आहे. असे असताना आता वाढत्या प्रवासी संख्येच्या सोयीसाठी एस.टी महामंडळाने दरवर्षी ताफ्यात ५ हजार नवीन बस दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महामंडळाच्या ताफ्यात डिसेंबर २०२६ अखेर ८ हजार ३०० नव्या गाड्यांची भर पडणार आहे. नव्या गाड्यांमध्ये साध्या, स्मार्ट, व्होल्वो (आसनी आणि शयनयान), मिनी बस अशा सर्वच श्रेणींच्या गाड्यांचा समावेश आहे. महत्वाचे म्हणजे साध्या बस ३ बाय २ आसनी असणार आहेत. एसटीकडे सध्या १४ हजार गाड्या आहेत. त्यापैकी १२ हजार ५०० गाड्या प्रवासी वाहतुकीसाठी रस्त्यावर धावत आहेत. तर उर्वरीत गाड्या नादुरुस्त असल्याने आगारात उभ्या आहेत.

एसटीने दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी राज्यभर प्रवास करतात. या प्रवाशांसाठी धावत असलेल्या १२ हजार ५०० बसची संख्या फारच कमी आहे. त्यामुळे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दरवर्षी महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार नव्या बस दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, ग्रामीण आणि तालुकास्तरासाठी ३ हजार साध्या बसच्या खरेदीची निविदा तयार केली



आहे. साध्या बसमध्ये तीन बाय दोन आसनक्षमता असणार आहे. यामुळे आसनक्षमतेत वाढ होणार आहे, नव्या वर्षात या बसेसची चाचणी होईल, असे म्हटले जात आहे.

## शहापूर तालुक्यात नांदगाव गावामध्ये हिवाळी शिबिराचे आयोजन



**अक्षराज : गणेश गायकर**


**दि.२८, शहापूर (ठाणे) :** अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन व सोसायटी जनरल सिक्युरिटी सर्व्हिसेस यांच्या मार्फत शहापूर तालुक्यातील दुर्गम भागात असणाऱ्या खेड्यापाड्यातील गावांमध्ये हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी शहापूर मधील नांदगाव या ठिकाणी अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन व सोसायटी जनरल सिक्युरिटी सर्व्हिसेस यांच्या वतीने ७ दिवसीय हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरात विविध प्रकारचे वैज्ञानिक प्रयोग, त्याचप्रमाणे पेपर क्रॉफ्ट, हस्तकला, मॉडेल तयार करणे असे उपक्रम घेण्यात येणार आहेत. या शिबिरात जवळपास २५ ते ३० मुलांनी आपली हजेरी लावली आहे. गावातील मुलांचा प्रतिसाद पाहून संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक प्रभावित झाले. अशा प्रकारे दिवाळीच्या सुट्टीमध्ये मुलांच्या सर्जनशीलतेला व कला कौशल्यांना वाव देऊन काहीतरी नवीन शिकण्याच्या दृष्टीने संस्थेच्या वतीनेहा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

# आवश्यकतेनुसार नवीन अंगणवाडी सुरू करण्याचे महिला व बालविकास मंत्री तटकरे यांचे निर्देश

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, मुंबई :** ज्या भागात लोकसंख्येप्रमाणे अंगणवाडी केंद्रांची आवश्यकता आहे, तिथे नव्याने अंगणवाडी सुरू करावी. तसेच मदतनीस व सेविकांच्या नियुक्तीसंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

१५० दिवसांच्या कामाचा आढावा, अंगणवाडी पर्यवेक्षिकांच्या पदोन्नती, अहिल्याभवन उभारण्यासाठी जागा निश्चितीकरण, बालसंगोपन योजनांचा



आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या. बैठकीस विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे, सहसचिव वि.रा. ठाकूर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. पुण्यात अहिल्याभवन अथवा महिलांचे वसतीगृह करण्यासंदर्भात जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीच्या माध्यमातून उभारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या. तसेच, बालसंगोपण योजनेसंदर्भात आढावा त्यांनी यावेळी घेतला.

ज्या अंगणवाडीमध्ये विद्यार्थी जास्त आहेत मात्र, मदतनीस, सेविकांची संख्या कमी आहे. आणि जिथे विद्यार्थी कमी आहेत अशा अंगणवाड्यांमध्ये सेविकांची पुनर्नियुक्ती करावी. नवीन अंगणवाड्यांची आवश्यकता कुठे आहे यासंदर्भात सर्वेक्षण करून, त्याप्रमाणे त्या प्रदेशात अंगणवाडी, मदतनीस व सेविका यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पर्यवेक्षिका, जिल्हा पर्यवेक्षिका यांना ग्रामविकास विभागातून महिला व बालविकास विभागात वर्ग करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश ही मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.